स्थापना- २८ ऑगस्ट १९०५
मराठी रंगभूमीची मध्यवर्ती संघटना
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
Akhil Bhartiya Marathi Natya Parishad
रजि. क्र. मुंबई ई २६३५

अध्यक्ष-
प्रशांत दामले

उपाध्यक्ष (प्रशासन)-
नरेश गडेकर

उपाध्यक्ष (उपक्रम)-
भाऊसाहेब भोईर

प्रमुख कार्यवाह-
अजित भुरे

कोषाध्यक्ष-
सतीश लोटके

सहकार्यवाह-
समीर इंदुलकर
दिलीप कोरके
सुनील ढगे

कार्यकारिणी सदस्य-
विजय चौगुले
सविता मालपेकर
सुशांत शेलार
संजय देसाई
दीपा क्षीरसागर
शंकर (दीपक) रेगे
गिरीश महाजन
विजयकुमार साळुंके
संजय रहाटे
विशाल शिंगाडे
संदिप पाटील

**दिनांक :- २३ मे २०२४**

**नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार नाट्य सिने अभिनेते अशोक सराफ व रोहिणी हट्टंगडी यांना.**

मुंबई - अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई च्या वतीने दरवर्षी १४ जून रोजी गो.ब. देवल पुरस्कार समारंभाचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या वर्षी जेष्ठ सिने-नाट्य अभिनेते अशोक सराफ व अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला. मागील तीन वर्षांपासून पुरस्कारांचे वितरण करण्यात आले नव्हते. नाट्य परिषदेची निवडणूक पार पडताच, कमी वेळात तातडीने नवनिर्वाचित नियामक मंडळाने जीवनगौरव पुरस्कार देण्याचे योजिले व पुरस्कार देण्यात आले.

यंदाच्या वर्षी १४ जून २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, मनमाला टँक रोड, मांटुगा - माहीम, मुंबई येथे सायंकाळी ४ वाजता सर्व पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली आहे.

नाट्य क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या नाट्यकर्मींचा सन्मान नाट्य परिषदेच्या वतीने दरवर्षी केला जातो. यानिमित्ताने कलावंतांचा मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच १०० व्या नाट्यसंमेलनानिमित्त घेण्यात आलेला 'नाट्यकलेचा जागर' यातील सर्वोत्कृष्ट पारितोषिक प्राप्त एकांकिका, बालनाट्य, एकपात्री, नाट्यछटा, नाट्यसंगीत पद गायन, नाट्य अभिवाचन कार्यक्रम यानिमित्ताने सादर होणार आहेत. कलावंत व नाट्य रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन श्री. प्रशांत दामले यांनी केले आहे.

टीप:

(सोबत पारितोषिक प्राप्त कलावंताची यादी सोबत जोडत आहोत)

प्रती,

मा. संपादक,

कृपया प्रसिध्दीसाठी

आपला विश्वासू,

(प्रशांत दामले)
अध्यक्ष

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद रजि. नं. ई-२६३५

यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहिम, मुंबई ४०००१६.
दूरध्वनी ०२२ २४३००५९४ / ०२२ २४३७७६४९
Website- www.natyaparishad.org Email- natyaparishad.org@gmail.com